# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ३८६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः–०५/०७/२०१६.

**१) घरात प्रवेश करून कोणत्यातरी वस्तुने मारून जखमी केले. :–**

दिनांक ०४/०७/०१६ रोजी ००.३० ते ०१.०० वा. दरम्यान जनाबाई बेवा दशरथ राऊत वय ५० वर्ष, रा. पंचशिल वार्ड साकोली हया त्यांच्या घरी झोपल्या असतांना कोणीतरी अज्ञात इसमाने घरात प्रवेश केला व फिर्यादीच्या खांदयावर, भुजेवर, पाठीवर व पोटावर कोणत्यातरी वस्तुने मारून जखमी केले. फिर्यादीचे बयाण व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४५२,३२४ भादंवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. बागडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) शुल्लक कारणावरून पती–पत्नीला मारहान करून जिवाने मारण्याची धमकी दिली. :–**

दिनांक ०४/०७/२०१५ रोजी २१.०० वा. सौ. अनुसया चुन्नीलाल पदवाड वय ६० वर्ष, रा. डोंगरी बु. ही तिच्या घरच्या विटावर झाकलेली झिल्लीकागद खाली पडल्यामुळे ते उचलुन विटावर झाकत होती, तेव्हा आरोपीने ''तु ऐवढया रात्री येथे का करते, ती जागा माझी आहे.'' असे म्हणुन भांडण, शिवीगाळ केली व लोखंडी सुरीने फिर्यादिच्या डाव्या गालावर मारून जखमी केले व तीच्या पतीला विटाने मारून दुखापत केली व जिवाने मारण्या पिटण्याची धमकी दिली. असे फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३२४,५०४,५०६ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. बावणे पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत

(के.एच.धात्रक)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, **संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.